महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

वर्ष ■ १८ ■ अंक : ३९ ■ सप्टेंबर २०२६ ■ पाने : ८

# महावितरणसाठी सेवा हाच संकल्प

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या मुख्यमंत्री व प्रधानमंत्री अशा संवैधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे झाल्याबद्दल राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. महावितरणने या कालावधीत विविध उपक्रम हाती घेतले आहेत. वीज ग्राहकांना थेट उपयोगाचे उपक्रम हे या अभियानातील सूत्र आहे. या अभियानामध्ये ग्राहकांच्या थेट सेवेसाठी सेवा सेतू शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत.

विजेचे कनेक्शन आणि बिलिंग हे दोन ग्राहकांच्या जिव्हाळ्याचे विषय आहेत. सेवा संकल्प अभियानामध्ये वीज जोडणीसाठीच्या प्रलंबित अर्जांचा निपटारा करणे आणि या कालावधीत प्राप्त नवीन अर्जांवर तातडीने कार्यवाही करणे यावर भर आहे. बिलिंगविषयीच्या प्रलंबित आणि नव्याने प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यावरही भर दिला आहे. विजेच्या बिलावरील ग्राहकाच्या नावात बदल हा आणखी एक महत्त्वाचा विषय आहे. नावात बदल अर्जांवर तातडीने कार्यवाही करणे याला अभियानात प्राधान्य देण्यात आले आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप ही राज्य सरकारची योजना शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरली आहे. यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानामुळे शेतकऱ्यांना केवळ ५ ते १० टक्के लाभार्थी हिस्सा भरून सौर पॅनेल्स व कृषी पंप असा संपूर्ण संच मिळतो. सौर कृषी पंपांच्या योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केले आहे. सेवा संकल्प अभियानात या योजनेत सहभागी होणाऱ्या अर्जदारांना मार्गदर्शन करणे आणि प्रलंबित अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. सौर कृषी पंप हे शेतकऱ्यांना वरदान ठरले आहेत.

**मोफत वीज आणि उत्पन्नाची संधी**

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने देशात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये घरगुती वीज ग्राहकांना छतावरील सौरनिर्मिती प्रकल्प

हितगुज



लोकेश चंद्र
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून थेट अनुदान देण्यात येते. एक किलोवॅटला ३० हजार रुपये, दोन किलोवॅटला ६० हजार रुपये व तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हाउसिंग सोसायट्यांनाही या योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशातील टॉप तीनच्या राज्यांमध्ये समाविष्ट आहे. आतापर्यंत राज्यात ७,९१,९८८ ग्राहकांनी या योजनेत सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत व त्यांची एकूण क्षमता ३००३ मेगावॅट आहे. या योजनेला आता मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पाच लाख गरीब वीज ग्राहकांना खूप कमी पैशात २५ वर्षे मोफत वीज मिळावी यासाठीच्या स्मार्ट योजनेची जोड मिळाली आहे. छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांमुळे गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण होऊन वीजबिल शून्य होते आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळते. सेवा संकल्प अभियानामध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सेवा सेतू शिबिरांमार्फत उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यात विविध ठिकाणी समर्पित स्टॉल उभे करून जनतेशी संवाद साधत योजनेची माहिती देणे, ग्राहकांची ऑनलाईन नोंदणी करून घेणे अशी काम करण्यात येत आहेत. या योजनेसाठी बँकांकडून ग्राहकांना कर्जही मिळते. त्यासाठी त्यांना मदत करण्यात येत आहे. थोडक्यात या योजनेसाठी अर्ज ते कर्ज अशी सर्व मदत करण्यात येत आहे.

या अभियानात विद्युत सुरक्षेवरही भर देण्यात आला आहे. वीज यंत्रणेचे सुरक्षा ऑडिट करणे, वाकलेले विद्युत खांब सरळ करणे, रोहित्रांच्या उघड्या पेट्यांची झाकणे लाऊन घेणे अशी कार्यवाही करण्याला प्राधान्य आहे. अनेकदा ग्रामपंचायतींकडून संभाव्य वीज अपघाताच्या ठिकाणांची माहिती मिळते. त्याची दखल घेऊन अपघात रोखण्यासाठीची उपाययोजनाही महत्त्वाची आहे.

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस दि. १७ सप्टेंबर रोजी साजरा झाला. त्यांनी नागरिकांच्या सेवेला अपार महत्त्व दिले आहे. आपण प्रधानमंत्री नव्हे तर प्रधानसेवक आहोत, असे ते म्हणतात. त्यांनी दाखविलेल्या दिशेने सर्वसामान्य वीज ग्राहक केंद्रबिंदू मानून महावितरणने या अभियानात उपक्रम आखले आहेत. या अभियानाच्या कालावधीतच २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांची जयंती साजरी होणार आहे. ग्राहकसेवेबाबत महात्मा गांधी यांचा खूप महत्त्वाचा संदेश आहे. ते म्हणतात, ''ग्राहक हे आमच्यासाठी नसून आम्ही ग्राहकांसाठी आहोत. त्यांची सेवा करून आम्ही त्यांच्यावर उपकार करीत नाही तर सेवा करण्याची संधी देऊन तेच आम्हाला उपकृत करीत आहेत.'' महावितरणचे मुख्य प्रयोजनच वीज ग्राहकांची थेट सेवा आहे. म्हणून सेवा हाच महावितरणचा संकल्प आहे. महात्मा गांधी यांच्या संदेशानुसार काम करत आपण यशस्वी होऊ या.

भारतरत्न विश्वेश्वरय्या यांची जयंती १५ सप्टेंबर रोजी साजरी झाली. हा दिवस अभियंता दिन म्हणून पाळण्यात येतो. यंदा महावितरणने त्या निमित्ताने विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचत याविषयी जनजागृती करण्याचा उपक्रम हाती घेतला. राज्यातील २७४८ शाळांमधील सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना या महत्त्वाच्या विषयांची माहिती दिली. कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी पुढाकार घेतात तेव्हा किती मोठ्या प्रमाणावर जनसंपर्क होऊ शकतो, याचे हे उदाहरण आहे. याच रितीने सेवा संकल्प अभियानातही महावितरण उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करतो.

# ग्राहक सेवा, वितरण हानी कमी करणे व संपूर्ण वीजबिल वसूली

## या त्रिसूत्रीवर काम करा: संचालक धनंजय औंढेकर




अकोला येथील आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक धनंजय औंढेकर. समवेत मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे व इतर अधिकारी.

**'इज ऑफ लिव्हींग'** संकल्पनेनुसार वीज ग्राहकांना सुरळीत सेवा देणे, वितरण व वाणिज्यिक हानी कमी करून वितरीत केलेल्या वीजबिलाची शंभर टक्के वसूली करणे या त्रिसूत्रीवर काम करा, असे निर्देश संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिले.

अकोला येथील विद्युत भवनमध्ये आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे, अधीक्षक अभियंते राजेश घाटोळे (अकोला), धनंजय अहेर (बुलडाणा), संदिप दरवडे (वाशिम), दिपक सोनोने (पायाभूत आराखडा) यांच्यासह अकोला परिमंडलातील सर्व विभागीय कार्यकारी अभियंते यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना संचालक औंढेकर म्हणाले, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणविस यांच्या नेतृत्वात राज्याने 'इज ऑफ लिव्हिंग' आणि 'इज ऑफ डूईंग'ची संकल्पना अंगिकारली आहे. त्यामुळे अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी जबाबदारी घ्या, वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याची कारणे शोधा आणि त्यावर कार्यवाही करा. फिडर सेपरेशनच्या उर्वरीत कामाला गती देवून शंभर टक्के कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा करा. तसेच मिश्र वाहिन्यांवरील ग्राहकांसाठी फिडरला एसडीटी बसविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

संचालक औंढेकर म्हणाले, ग्राहकांना अचूक आणि वापराइतके बिल गेले पाहिजे, याची कटाक्षाने काळजी घ्या. नादुरुस्त मीटर तातडीने बदलून त्याठिकाणी स्मार्ट मीटर बसवा. ग्राहकांना स्मार्ट मीटरच्या अचूकतेविषयी माहिती देवून त्यांचा गैरसमज दूर करा. प्रलंबित असलेल्या वीज जोडण्या तातडीने द्या. वाणिज्यिक आणि वितरण हानी कमी करण्यासाठी वितरीत केलेल्या वीज बिलाची शंभर टक्के वसूली करा. थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करा व वीजचोरी शोध मोहिम तीव्र करा. कामातील निष्काळजीपणा किंवा हयगय खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

**उद्योजकांसोबत संवाद:** जिल्ह्याच्या विकासात औद्योगिक ग्राहक महत्त्वाची भूमिका बजावत असून त्यांना दर्जेदार व अखंडित वीज सेवा देण्यासाठी महावितरण पूर्णपणे बांधिल आहे. जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांच्या समस्या कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आणि भविष्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही संचालक धनंजय औंढेकर यांनी दिली. अकोला इंडस्ट्रियल असोसिएशन भवन येथे आयोजित औद्योगिक ग्राहकांच्या बैठकीत ते उद्योजकांशी संवाद साधत होते. यावेळी मुख्य अभियंते राजेश नाईक (नागपूर), मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे (अकोला), दिलीप दोडके (अमरावती), उद्योजकांच्या संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, माजी स्वतंत्र संचालक आशिष चंदाराणा, नितीन बियानी, उमेश मालू आदी उपस्थित होते.

# मानव संसाधन विभागाच्या विशेष व्हॉट्स ॲप सेवेचा

## संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते शुभारंभ

**अमरावती** परिमंडलातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना वीज सेवेशी निगडीत काम करतांना त्यांचे मनोधैर्य उंच राखणे व त्यांच्या सर्व समस्या निकाली काढून सुविधांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी मानव संसाधन विभागाकडून सुरू केलेल्या विशेष व्हॉट्स ॲप सेवेचा शुभारंभ संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

अमरावती येथील विद्युत भवनमध्ये संचालक राजेंद्र पवार यांनी अमरावती मंडलाच्या मानव संसाधन विभागाची सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीला मुख्य अभियंता दिलीप दोडके (अमरावती), दत्तात्रय बनसोडे (अकोला), अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना संचालक पवार यांनी व्यवस्थापनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहचवण्यासाठी तत्परतेने काम करण्याचे निर्देश दिले. तसेच कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित दावे, पदोन्नती पॅनल्स आणि शिस्तभंग कारवाईशी संबंधित प्रकरणांचा निर्धारित वेळेत निपटारा करण्याचे निर्देश दिले.

अमरावती परिमंडलाच्या मानव संसाधन विभागाने कर्मचाऱ्यांसाठी विशेष व्हॉट्स ॲप सेवा सुरू केली आहे. यात कर्मचाऱ्यांना कार्यालयात न येता थेट व्हॉट्स ॲपवरच नोंदणीकृत मोबाईलवरून समस्या/तक्रारी मांडता येणार आहेत. त्यानंतर परिमंडल कार्यालयांकडे प्राप्त तक्रारींचा पाठपुरावा करून त्या तत्काळ सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ही सेवा कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थापनाविषयी विश्वास निर्माण करणारी आहे, असे कौतुकोद्गार संचालक पवार यांनी काढले.



व्हॉट्स ॲप सेवेचा शुभारंभ करतांना संचालक राजेंद्र पवार. सोबत मुख्य अभियंते दिलीप दोडके, दत्तात्रय बनसोडे व अधीक्षक अभियंता दिपक देवहाते आदी.

यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट, संजय शृंगारे, अमित बुटे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक सुर्यकांत फलटणकर, व्यवस्थापक कल्पना भुले यांच्यासह उपव्यवस्थापक, मुख्य लिपिक, वरिष्ठ व कनिष्ठ लिपिक यांची उपस्थिती होती.

# एनर्जी लिडरशिप परिषदेत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना एनर्जी लिडरशिप अवॉर्ड

## महावितरणला ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी पुरस्कार




मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना नवी दिल्ली येथे 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड-२०२६' ने गौरविण्यात आले.

**ऊर्जा परिवर्तनाची** प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जेद्वारे शेतीला दिवसा वीज तसेच ग्रामीण अर्थकारणाला बळ, गुंतवणूक व रोजगार संधी, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्त आदींच्या माध्यमातून महावितरणने देशाच्या वीज क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या नेतृत्वासाठी मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'ने गौरविण्यात आले. तर वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी तंत्रज्ञानासाठी महावितरणचा 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने सन्मान करण्यात आला.

भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि भविष्यातील दिशा यावर मंथन करण्यासाठी ६ व्या ईटी एनर्जी लीडरशिप समिट-२०२६ चे नवी दिल्ली येथे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय परिषदेत ऊर्जा क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र व विविध राज्य सरकारचे तसेच वीज क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे प्रमुख, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान पुरवठादार आदींची उपस्थिती होती. लोकेश चंद्र यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सौर ऊर्जेच्या माध्यमातून बदलणारे ग्रामीण अर्थकारण, गुंतवणूक, रोजगार, शेतीसाठी दिवसा वीज आणि इतर सकारात्मक बदलांची माहिती दिली.

या परिषदेत सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्या हस्ते अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर महावितरणचा पुरस्कार लोकेश चंद्र यांच्यासह कार्यकारी संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता संतोष सांगळे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) भूषण कुलकर्णी यांनी स्वीकारला. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांचे तसेच महावितरणच्या सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी महावितरणचा चेहरामोहरा बदलला आहे. ऊर्जा परिवर्तनामुळे वीजदरात प्रथमच कपात करण्यात आली असून येत्या वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहेत. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६२५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प पूर्ण झाले असून १७ लाख ५२ हजारांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे.

यासोबतच पीएम कुसुम-बी योजनेतून देशात आजमितीस १७ लाख ४२ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात तब्बल ६५ टक्के म्हणजे ११ लाख ५४ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर योजनेसाठी महावितरणला केंद्र शासनाचे नुकतेच आठ पुरस्कार मिळाले असून राज्यात आतापर्यंत ७ लाख ७७ हजार ५१६ घरांवर २९४७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

महावितरणने वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंग तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरु केला आहे. यासाठी विकसित केलेल्या 'एआय/एमएल-ड्रिव्हन डिमांड फोरकास्टिंग इंजिन' या तंत्रज्ञानाच्या कामगिरीची दखल घेत महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. १२ सप्टेंबर २०२४ पासून हे 'एआय'चे स्वयंचलित तंत्रज्ञान पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे वीज खरेदी खर्च, मागणी-पुरवठ्यातील तफावत, ग्रीड स्थैर्य, थेट आर्थिक नियोजन आदींमध्ये मोठे यश मिळवले आहे आणि आतापर्यंत वीज खरेदीमध्ये तब्बल १२०० कोटी रुपयांची बचत झाली आहे.

# संचालक राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय ‘एमिनेंट इंजिनियर’ पुरस्कार प्रदान

## महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सन्मान




▸▸अमरावती येथे 'एमिनेंट इंजिनियर' हा पुरस्कार महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते संचालक राजेंद्र पवार यांना प्रदान करण्यात आला.

**विद्युत क्षेत्रातील** योगदानाबद्दल 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' संस्थेने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांचा 'एमिनेंट इंजिनियर' या राष्ट्रीय पुरस्कारांने सन्मान केला. अमरावती येथे महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

‘आयईआय’च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनात ‘विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट’ या विषयावर विचारमंथन झाले. ‘आयईआय’च्या वतीने जाहीर झालेला ‘एमिनेंट इंजिनियर’ पुरस्कार संचालक राजेंद्र पवार यांना महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रवीण तायडे, ‘आयईआय’चे अध्यक्ष मनिष कोठारी, पदाधिकारी आनंद जवंजाळ, राम विघे, आर. आर. तंवर, सुनील राठी आदींची उपस्थिती होती.

महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार आणि मानवी प्रगतीचे शिलेदार आहेत. भारताच्या अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. जगातील सर्वोत्तम अभियंते भारतात आहेत. विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांची अद्भूत कार्यक्षमता ऊर्जामंत्री म्हणून काम करताना मी जवळून अनुभवली आहे. एलिफंटा बेटासारख्या दुर्गम ठिकाणी समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहचवण्याचे अशक्यप्राय आव्हान महावितरण व महापारेषणच्या अभियंत्यांनी लिलया पेलले. हा प्रकल्प म्हणजे भारतीय अभियांत्रिकीच्या कौशल्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे, अशा शब्दांत यांनी अभियंत्यांचा सन्मान केला.

संचालक राजेंद्र पवार यांनी ‘विकसित भारत २०४७ चे ऊर्जा उद्दिष्ट: आधुनिक ऊर्जा सुलभतेचा आराखडा आणि महाराष्ट्राची आघाडी’ या विषयावर सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले. देशातील सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडियाची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता येथे मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत. विद्युत क्षेत्रामधील ३७ वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल संचालक राजेंद्र पवार यांचा या संस्थेकडून एमिनेंट इंजिनियर’ राष्ट्रीय पुरस्काराने गौरव करण्यात आला.

# कुंभमेळ्यात सुरळीत व सुरक्षित वीजपुरवठ्यासाठी यंत्रणेच्या कामांना गती द्या!

## संचालक राजेंद्र पवार यांचे निर्देश

**आगामी सिंहस्थ** कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक नगरीत येणाऱ्या कोट्यवधी भाविकांना आणि स्थानिक नागरिकांना सुरळीत, सुरक्षित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण पूर्ण क्षमतेने सज्ज होत आहे. पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण आणि सूक्ष्म नियोजन करून या कामांना अधिक गती देण्याचे निर्देश संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले.

नाशिक ऊर्जा व्यवस्थापन आणि प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. कुंभमेळा काळात सुरळीत व सुरक्षित वीज पुरवठा राखणे हेच प्रमुख उद्दिष्ट ठेवून नियोजित यंत्रणेची सर्व विकास कामे अत्यंत गुणवत्तापूर्ण आणि ठरवून दिलेल्या कालबद्ध मर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या. मुख्य अभियंते सुंदर लटपटे, महेंद्र वाळके (महापारेषण), अधीक्षक अभियंते देवेंद्र सायनेकर, अनिल थोरात, रमेशकुमार पवार, श्रीकृष्ण नवलाखे (महापारेषण) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुंभमेळ्याच्या मुख्य तयारीसोबतच नाशिक परिमंडलातील इतर दैनंदिन व धोरणात्मक कामकाजाचाही सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. यात थकबाकी वसूली, वीजवाहिनी विलगीकरण व सक्षमीकरण, ग्राहक सेवा, नवीन वीजजोडण्या, वीजहानी कमी करण्याच्या उपाययोजना, वीजचोरीविरुद्ध कठोर उपाययोजना आणि विविध सौर ऊर्जा योजनांच्या अंमलबजावणीचा समावेश होता.



▸▸ नाशिक येथील उपकेंद्राच्या कामाची पाहणी करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत मुख्य अभियंता सुंदर लटपटे व इतर अधिकारी.

संचालक पवार यांनी नव्याने उभारण्यात येत असलेल्या ३३/११ केव्ही नांदूर-मानूर, गोदापार्क उपकेंद्र, ३३/११ केव्ही मेरी उपकेंद्राच्या क्षमतावाढ तसेच महापारेषण कंपनीकडून नव्याने उभारण्यात येणाऱ्या मेरी १३२/३३ केव्ही (जीआयएस) या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रगतीचा आढावा घेतला.

# अतिदुर्गम सिरोंच्यासाठी तेलंगणामधून पर्यायी व्यवस्था

## संचालक धनंजय औंढेकर यांच्याकडून आढावा



सिरोंचा तालुक्याला पर्यायी वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी सिरोंचा येथे १३२/६६/३३ केव्ही उपकेंद्राच्या कामांची पाहणी करताना संचालक धनंजय औंढेकर. समवेत मुख्य अभियंता हरिश गजबे, अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर व अमलेश लोणारे आदी.

**मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस** हे पालकमंत्री असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम सिरोंचा तालुक्याला आणखी दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी तेलंगणा राज्यातून पर्यायी व्यवस्था तयार करण्यासाठी महापारेषण व महावितरणकडून वीजयंत्रणेची उभारणी वेगाने सुरू आहे. संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी या कामांची पाहणी केली व आढावा घेतला.

गडचिरोली जिल्ह्याच्या मुख्यालयापासून सुमारे २५० किलोमीटरवर असलेला सिरोंचा तालुका हा अत्यंत दुर्गम, ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. या तालुक्याच्या पूर्वेला छत्तीसगड आणि दक्षिणेला तेलंगणा राज्य आहे. या तालुक्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी व इतर असे १३ हजार ९२८ वीजग्राहक आहेत. सिरोंचा येथे महापारेषणच्या ६६/३३ केव्ही उपकेंद्रातून महावितरणच्या ३३/११ केव्हीच्या पाच उपकेंद्रांना आणि तिथून संपूर्ण तालुक्याला सुमारे २२ मेगावॅट विजेचा पुरवठा केला जातो.

तथापि, महापारेषणच्या सिरोंचा ६६/३३ केव्ही उपकेंद्राला आलापल्ली येथील १३२/६६ केव्ही उपकेंद्रातून तब्बल ९३ किलोमीटर लांबीच्या ६६ केव्ही वीजवाहिनीद्वारे वीजपुरवठा केला जातो. जीमलगट्टाचे घनदाट जंगल, नद्या व नाल्यांमुळे पावसाळ्यात संपर्क तुटत असल्याने या वीजवाहिनीमधील बिघाड शोधणे, दुरुस्ती करणे अत्यंत जिकीरीचे व खडतर बनते. या भागात संपर्काचे कोणतेही नेटवर्क नाही. त्यामुळे सुरळीत वीजपुरवठ्याच्या पर्यायी व्यवस्थेची उपाययोजना म्हणून सिरोंचा येथून ३२ किलोमीटरवर असलेल्या तेलंगणा राज्यातील किस्तमपेठ (जि. मंचेरियल) येथून सिरोंचापर्यंत ११३ टॉवर उभारून १३२ केव्ही अति उच्चदाबाच्या वीजवाहिनीचे काम महापारेषण कंपनीकडून सुरू करण्यात आले आहे. येत्या जानेवारीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

सोबतच सिरोंचा येथील महापारेषणच्या ६६/३३ केव्ही उपकेंद्रांच्या ठिकाणी १३२/६६/३३ क्षमतावाढीचे काम पूर्ण झाले आहे. या कामांची संचालक धनजंय औंढेकर यांनी पाहणी केली व आढावा घेतला. यासोबतच महावितरणच्या उपकेंद्रांमध्ये आवश्यक नुतनीकरणाचे कामे सुरू आहेत. यात सिरोंचा ३३/११ केव्हीचे नवीन उपकेंद्र कार्यान्वित देखील झाले आहे. या उपकेंद्रात ५ एमव्हीएचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर आहे. तिथे ५ एमव्हीएचे आणखी एक पॉवर ट्रान्सफॉर्मर लावण्याची सूचना संचालक धनंजय औंढेकर यांनी केली. यावेळी चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिश गजबे, गडचिरोलीचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर व अमलेश लोणारे (महापारेषण), आलापल्ली विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र वाघमारे, विलास रंगारी (महापारेषण), उपकार्यकारी अभियंता भारत बालपांडे आदींची उपस्थिती होती.

# बदलत्या वीज क्षेत्रासाठी महावितरण सज्ज

## संचालक धनंजय औंढेकर यांचे प्रतिपादन

**बदलत्या** काळानुसार वीज क्षेत्रात झपाट्याने होत असलेल्या तांत्रिक बदलांचा स्वीकार करून ग्राहकांना अधिक सक्षम, पारदर्शक व आधुनिक सेवा देण्यासाठी आपल्या प्रत्येक कर्मचाऱ्याने समर्पित भावनेने कार्य करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी केले.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित भांडूप परिमंडलातील कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता संजय पाटील, अधीक्षक अभियंते दीपक पाटील, धनराज बिक्कड व लक्ष्मण काकडे यांच्यासह अभियंते, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुरुवातीला मुख्य अभियंता पाटील यांनी महसूल वाढ व वीज हानी कमी करण्यासाठी परिमंडलात सुरु असलेल्या कामकाजाचा आढावा संगणकीय सादरीकरणातून मांडला.

सचांलक धनंजय औंढेकर म्हणाले, वीजचोरीला प्रतिबंध करून वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणे, चांगली ग्राहकसेवा देणे व महसुलात वाढ करणे हे अत्यंत महत्वाचे आहे. वीज वितरण क्षेत्रातील महत्त्वाचा बदल म्हणून स्मार्ट मीटरचा व्यापक वापर अत्यावश्यक आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज वापराबाबत अधिक अचूक माहिती उपलब्ध होण्यासोबतच ग्राहकांना आपल्या वीज वापराचे नियोजन करण्यास मदत होणार आहे. स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या मनातील गैरसमज दूर करून त्यांना या आधुनिक प्रणालीचे फायदे सोप्या भाषेत समजावून सांगण्याची जबाबदारी कर्मचाऱ्यांनी स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

संचालक धनंजय औंढेकर म्हणाले, सौरऊर्जेमुळे ग्राहकांच्या वीज खर्चात बचत होण्यासोबतच स्वच्छ ऊर्जेच्या वापराला चालना मिळणार आहे. ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी समर्पितपणे, जबाबदारीने व टीमवर्कच्या भावनेने काम करणे, हीच भविष्यातील यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास भांडूप परिमंडलातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




संचालक धनंजय औंढेकर.

# उत्तम ग्राहक सेवा, शंभर टक्के वसुली व गळती रोखा!

## संचालक योगेश गडकरीं यांचे निर्देश

**ग्राहक** हेच आपल्या सेवेचे मुख्य केंद्रस्थान असून त्यांना अखंडित व गुणवत्तापूर्ण सेवा देणे, वितरण आणि वाणिज्यिक हानी पूर्णपणे रोखणे तसेच वितरीत केलेल्या वीजबिलांची शंभर टक्के वसुली करणे या त्रिसूत्रीवर कर्मचाऱ्यांनी मिशन मोडवर काम करावे, असे निर्देश संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांनी दिले.

नागपूर येथे आयोजित नागपूर आणि अमरावती परिमंडलाच्या संयुक्त आढावा बैठकीत ते बोलत होते. संचालक गडकरी म्हणाले, ग्राहकांना त्यांनी वापरलेल्या विजेचेच अचूक बिल गेले पाहिजे, याची सर्व यंत्रणांनी काटेकोर काळजी घेतली पाहिजे. मीटरचे रिडिंग मिळत नाही किंवा मीटर नादुरुस्त (फॉल्टी) आहे, अशा ठिकाणी संबंधित मीटर तत्काळ बदलावेत. नवीन तंत्रज्ञानाबाबत ग्राहकांच्या मनात असलेल्या शंका व गैरसमज दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटरच्या अचूकतेविषयी प्रत्यक्ष संवाद साधून जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

संचालक गडकरी म्हणाले, प्रलंबित नवीन वीजजोडण्या त्वरित द्याव्यात. मानक कार्यपद्धतीनुसार ठरवून दिलेल्या वेळेत नवीन ग्राहकांना जोडणी मिळालीच पाहिजे. या कामात कोणतीही हयगय किंवा निष्काळजीपणा केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल. चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस वीज हानी एकेरी आकड्यावर आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत. थकबाकीदारांचा वीजपुरवठा नियमानुसार खंडित करावा. वीज चोरीमुळे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी विशेष शोध मोहीम तीव्र करा. वीजचोरीचे देयक मिळूनही भरणा न करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध थेट पोलीस गुन्हे दाखल करावेत. स्वयंचलित प्रणालीद्वारे पुरवठा खंडित ग्राहक वीजबिल भरत नसतील तर अशा प्रत्येक ग्राहकाच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष तपासणी करावी व अनधिकृत वापर अथवा वीजचोरी आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



▸▸ नागपुर येथील आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक योगेश गडकरी. समवेत मुख्य अभियंते मंगेश कोहाट, दिलीप दोडके आणि राजेश नाईक आदी.

संचालक गडकरी यांनी दोन्ही परिमंडलांतील वीजबिल वसुलीची स्थिती, लघुदाब गैरकृषी वीज विक्रीचे उद्दिष्ट आणि साध्य, पीसी झीरो ग्राहकांचे बिलींग, जुन्या नॉन-स्मार्ट मीटर ग्राहकांचे सरासरी व अनियमित बिलींग, १० किलोवॉटपेक्षा जास्त क्षमता असलेल्या रुफटॉप सोलर ग्राहकांचे बिलींग, तसेच २० हॉर्स पॉवर किंवा त्याहून अधिक मंजूर भार असलेल्या उच्चदाब व लघुदाब कृषी ग्राहकांकडील थकबाकीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच नादुरुस्त वितरण रोहित्रांची दुरुस्ती आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या प्रगतीची पाहणी केली.

या बैठकीला मुख्य अभियंते मंगेश कोहाट, दिलीप दोडके, राजेश नाईक, अधीक्षक अभियंते स्वप्निल गोतमारे, अमित परांजपे यांच्यासह दोन्ही परिमंडलातील कार्यकारी अभियंते, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) उपस्थित होते.

# कोल्हापूर परिमंडल राज्यात रोल मॉडेल करा!

## कार्यकारी संचालक परेश भागवत यांच्या सूचना

**स्मार्ट मीटर** बसविण्यात कोल्हापूर परिमंडलाने राज्यात आघाडी घेतली आहे. परिमंडलात १०० टक्के स्मार्ट मीटर बसवून रोल मॉडेल बनवण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करा, असे आवाहन कार्यकारी संचालक परेश भागवत यांनी केले.

परिमंडल कार्यालयातील ऊर्जा शक्ती सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, अधीक्षक अभियंते गणपत लटपटे, अमित बोकील, सहा. महाव्यवस्थापक शशिकांत पाटील, विजय गुळदगड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर, प्रणाली विश्लेषक बाळकृष्ण पाटील यांच्यासह कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

कार्यकारी संचालक भागवत म्हणाले, मीटरचे रीडिंग, फोटो व्हेरिफिकेशन आणि बिलिंगमध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही व ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे योग्य बिलिंग होईल याची काळजी घ्या. स्मार्ट मीटरच्या माध्यमातून प्राप्त अहवालाच्या आधारे वीज चोरांवर कारवाई करा. सध्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात सुमारे ७० टक्के स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. ५४ उपविभागांपैकी २६ उपविभागांमध्ये ७० टक्क्यांपेक्षा अधिक स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून, नेसरी व पन्हाळा या दोन उपविभागांमध्ये १०० टक्के स्मार्ट मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण अत्यल्प झाले आहे.



▸▸ कोल्हापूर परिमंडलाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक परेश भागवत. समवेत मुख्य अभियंता स्वप्नील काटकर.

कार्यकारी संचालक भागवत म्हणाले, महसूल वेळेत प्राप्त होणे महत्त्वाचे असून, बिलिंग आणि वसुलीची प्रक्रिया अधिक प्रभावी करा. बिलिंग व रीडिंग यंत्रणेची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी परिमंडल आणि मंडल स्तरावर स्वतंत्र पथके तयार करून नियमित तपासणी करा. मानव संसाधन विभागाचा आढावा घेऊन त्यांनी सेवापुस्तिका, बदल्या, गोपनीय अहवाल, मनुष्यबळ प्रशिक्षण, सुरक्षा, उच्च वेतनश्रेणी व अनुकंपाच्या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. बैठकीनंतर विविध कर्मचारी संघटना व मीटर रीडिंग एजन्सीच्या प्रतिनिधींशीही त्यांनी संवाद साधला.

# उपकेंद्र कंत्राटदारांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा

## संचालक सचिन तालेवार यांच्याकडून मार्गदर्शन




▸▸ प्रकल्प विभागातील अधिकारी आणि उपकेंद्र कंत्राटदारांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संचालक सचिन तालेवार. समवेत अधीक्षक अभियंता संतोष सांगळे व इतर अधिकारी.

**प्रकल्प विभागातील** अधिकारी आणि उपकेंद्र कंत्राटदारांसाठी प्रकाशगड मुख्यालयाच्या सभागृहात प्रशिक्षण कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेच्या (AIIB) निकषांनुसार पर्यावरण, सामाजिक सुरक्षितता, जमीन आणि समुदायविषयक धोक्यांची वेळेत ओळख पटवणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. यात सहभागींना Generic ESMP आणि C-ESMP च्या अंमलबजावणीसह हवा, आवाज आणि पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण, दस्तऐवजीकरण आणि सुरक्षा नियमांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत उपकेंद्रांचे काम प्रामुख्याने अकोला आणि जळगाव परिमंडलात सुरू आहे. या कार्यशाळेत ७ उपकेंद्र कंत्राटदार संस्थांमधील १० प्रतिनिधी आणि मुख्यालयातील पीएमयू टीम व्यतिरिक्त एकूण ४० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

**'मूट कोर्ट' उपक्रमाने वेधले लक्ष** – या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण म्हणजे मूट कोर्ट (सिम्युलेटेड न्यायालयीन कामकाज) हा नाविन्यपूर्ण उपक्रम होता. सहभागींना याचिकाकर्ते (शेतकरी/स्थानिक नागरिक) आणि प्रतिवादी (महावितरण व कंत्राटदार) अशा दोन गटांत विभागून प्रत्यक्ष वादाचा प्रसंग सादर करण्यात आला. 'जे काम केले जाते त्याची योग्य नोंद (दस्तऐवजीकरण) होणे अत्यंत आवश्यक आहे' हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला. व्यावसायिक सुरक्षा, पारदर्शकता आणि नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी दस्तऐवजीकरण किती गरजेचे आहे, हे या सरावातून स्पष्ट करण्यात आले.

# कार्यकारी संचालकपदी कावळे, पाटील, मिश्रा, काकडे रूजू



▸▸ कार्यकारी संचालक अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे.

**प्रादेशिक संचालक** / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा व सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.

कार्यकारी संचालक अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून ते तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक चंद्रमणी मिश्रा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. ते कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

कार्यकारी संचालक सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. त्यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून सुनील काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

# 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची'; पुस्तकाचे प्रकाशन



'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' पुस्तकाचे प्रकाशन करताना ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र.

**मानव संसाधन** विभागाने गेल्या सव्वा वर्षात राबवलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, धोरणात्मक निर्णय आणि कर्मचारी कल्याणाच्या योजनांचा लेखाजोखा मांडणाऱ्या 'प्रकाशगाथा, महावितरणच्या मानव संसाधनाची' या पुस्तकाचे प्रकाशन ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते झाले.

प्रकाशगड मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाला संचालक अनुदीप दिघे (वित्त), धनंजय औंढेकर (संचालन), योगेश गडकरी (वाणिज्य), सचिन तालेवार (प्रकल्प), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक परेश भागवत (मानव संसाधन), मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी या पुस्तकाच्या शुभेच्छा संदेशामध्ये मानव संसाधन विभाग आणि अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांच्या विविध उल्लेखनीय कामांचा गौरव केला आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक राजेंद्र पवार यांनी मानव संसाधन विभागाला गेल्या सव्वा वर्षांच्या कार्यकाळात विविध कल्याणकारी निर्णय आणि उपक्रमांच्या माध्यमातून लोकाभिमुख व कर्मचारीभिमुख चेहरा मिळवून दिला आहे.

शून्य विद्युत अपघातासाठी विविध उपाययोजना, विश्वविक्रमी विद्युत सुरक्षा जनजागृती अभियान, महिला कर्मचारी सक्षमीकरण व सन्मान, अभियंते व जनमित्रांचा सन्मान, कर्मचारी संघटनांशी मासिक संवाद, कौटुंबिक स्नेहमेळावे, हरित ऊर्जेसाठी अर्थसाहाय्य, क्रीडा व नाट्यस्पर्धा, प्रशिक्षण व भरती प्रक्रिया, कर्मचारी कुटुंबांसाठी विविध कल्याणकारी योजनांच्या आर्थिक तरतूदीत वाढ आणि या सर्वांची अंमलबजावणी यावर हे पुस्तक आधारित आहे. उपमुख्य जनसंपर्क अधिकारी निशिकांत राऊत यांनी या पुस्तकाचे लेखन व संपादन केले आहे.

या कार्यक्रमाला विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता मंगेश कोहाट, मुख्य अभियंते सुनील काकडे, दिपक कुमठेकर, राजेश नाईक, दत्तात्रेय बनसोडे, सुंदर लटपटे, चंद्रमणी मिश्रा, अरविंद बुलबुले, ज्ञानेश कुलकर्णी, अंकुर कावळे, पवनकुमार कच्छोट, पंकज तगलपल्लेवार, राजाराम माने, अनिल डोये यांच्यासह अधिकारी व अभियंते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक (मानव संसाधन) यांचे तांत्रिक सहायक डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभारही त्यांनीच मानले.

## हार्दिक अभिनंदन!



**साईनाथ बोंगाणे**
मुख्य अभियंता
(पॉवर मॅनेजमेंट ॲण्ड ट्रेडिंग)



**मंगेश कोहाट**
मुख्य अभियंता
(बिलिंग ॲण्ड अॅनॅलिटीक्स)



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)